## आरव्हीएसएफ वाहने स्क्रॅप करण्यासाठी केंद्रांना मान्यता

**यवतमाळ** : परिवहन आयुक्त कार्यालयाने आरव्हीएसएफ वाहने स्क्रॅप करण्यासाठी केंद्रांना मान्यता दिलेली आहे. सदर केंद्र खालील प्रमाणे आहे. ऑटोमोटीव्ह मॅनिफॅक्चर प्रायव्हेट लिमिटेड, कामठी रोड, नागपुर. भाग्यलक्ष्मी रोलींग मिल प्रायव्हेट लिमिटेड, दरेगांव, जालना. भोसले ऑटोमोटीव्ह, कुरुळी, ता. खेड जि. पुणे. मे.बी. एम. मोटर्स प्रायव्हेट लिमिटेड, पुणे सोलापुर एक्सप्रेस हायवे, दौंड, पुणे. री वाहन रिसायकल्स प्रायव्हेट लिमिटेड, आसोळी, महाळगाव, ता. कामठी, जि. नागपुर, टाटा इंटरनॅशनल व्हेईकल एप्लीकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, संतोष नगर, खेड, रायगुरुनगर, पुणे या केंद्रांचा समावेश आहे.आपले वाहन निष्कासन करू इच्छिणाऱ्या जुन्या वाहनांच्या वाहनधारकांनी पर्यावरणपुरक निष्कासनासाठी वरील आरव्हीएसएफ केंद्रांवर आपले वाहन निष्कासित करुन घ्यावे, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत देशमुख यांनी कळविले आहे.

# कारच्या जबर धडकेने ठार झालेल्याचा पाय तुटून झाला वेगळा

**पांढरकवडा, दि.९, महासागर प्रतिनिधी:** पाणीपुरी विकून परत येत असताना ईरटीका कारने जबर धडक दिल्याने, पाणीपुरी विक्रेता जागीच ठार झाल्याची घटना पांढरकवडा शहरापासून पाच किलोमीटर अंतरावरील चालबर्डी गावाजवळ घडली. रामाजनक बघेल असे ठार झालेल्या पाणीपुरी विक्रेत्यांचे नाव आहे.





याबाबत पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार पांढरकवडा शहरातील पाणीपुरी विक्रेता रामा जनक बाबुराव बघेल मुळचा मध्यप्रदेशातील रहिवासी हा नेहमीप्रमाणे शहरापासून पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या चालबर्डी गावात पाणीपुरी विकण्यासाठी गेला होता.पाणी पुरी विकून रात्री आठ साडेआठच्या दरम्यान तो पांढरकवडा शहराकडे परत येत होता.

चालबर्डी गावाजवळील पुलावर पांढरकवडा शहराकडून महांडोळी गावाकडे जाणारी ईरटीका कार क्रमांक एम एच ३४ बी बी ०९९८ ने समोरून येणाऱ्या पाणीपुरी विक्रेत्याच्या ढकलगाडीला समोरासमोर जबरदस्त धडक दिली. धडक इतकी जबरदस्त होती की पाणीपुरी विक्रेता पुलावर जागीच ठार झाला. या जबरदस्त धडकेत मृतकाचा एक पाय शरीरापासून अलग तुटून पडला होता.

दरम्यान या अपघातात रघुनाथ कोवे, सुरेश विष्णू नैताम ,युवराज प्रकाश पेंदोर, अंकुश कोवे जयप्रकाश पेंदोर सर्व राहणार महांडोळी हे जखमी झाले असून त्यांना यवतमाळ येथे पुढील उपचाराकरता रवाना करण्यात आले. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक गजभिये व सहकारी करीत आहेत.

# बारदाना दुकानाला लागली आग

**यवतमाळ, दि.९, महासागर प्रतिनिधी:** आर्णी शहरातील शारदा हॉटेल चे संचालक भोलू गुप्ता यांच्या बारदाना सेंटरला आग लागली यात मोठे नुकसान झाले कोणत्याही प्रकार ची जीवित हानी झाली नाही. दुकानातील पंखा चालू असल्याने शॉर्ट सर्किट झाल्याचा अंदाज दर्शवण्यात आला.



काल रात्री अचानक दुकानात धुर निघतांना दिसताच नागरीकांनी सुचना दीली दुकान उघडुन त्यावर नागरिकांनी पाणी मारल्याने मोठी दुर्घटना टळली. काही युवकांनी पाणी मारून आगी वर नियंत्रन मिळविले.

आर्णी नगर परिषद अग्नी शमकदलाची गाडी आली नगर परिषदच्या कर्मचाऱ्याला संपर्क होण्यास उशीर झाला. तेव्हापर्यंत काही धाडसी युवकांनी बाजूच्या दुकानात पाईप द्वारे व समोरील ॲक्वा सेंटर मधील पाणी आणून आगी वर नियंत्रण मिळविले.व मोठी दुर्घटना टळली.

# राज्य क्रीडा दिन कार्यक्रमाचे आयोजन

**यवतमाळ, दि.९, महासागर प्रतिनिधी:** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्यावतीने दि.१५ जानेवारी रोजी ऑलिंपिक वीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्म दिवस राज्य क्रीडा दिन साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त विविध कार्यक्रम घेतले जाणार असून त्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दिवंगत खाशाबा जाधव ऑलिंपिक क्रीडा स्पर्धा, हेलसिंकी येथे १९५२ मध्ये वैयक्तिक क्रीडा प्रकारातील कुस्ती मध्ये पहिले कास्य पदक पटकावून देशाच्या क्रीडा क्षेत्रात ऐतिहासीक कामगिरी केली आहे. त्यांची आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरी राज्याचा बहुमान असून नवोदित खेळाडुंना प्रोत्साहन व प्रेरणा देण्याकरीता राज्यभरात त्यांचा जन्मदिवस १५ जानेवारी क्रीडा दिन म्हणुन साजरा केला जातो.

या दिवसानिमित्त जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळा, कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालय, एकविध क्रीडा संघटना, क्रीडा मंडळ, क्रीडा केंद्र, स्पोर्ट्स क्लब इत्यादींनी विविध स्पर्धेचे आयोजन व विजेत्यांना पुरस्कार वितरण, शाळेतील राज्यस्तर, राष्ट्रीयस्तर क्रीडापटूंचे गौरव, विद्यार्थ्यांना यशस्वी खेळाडुंबाबत मार्गदर्शन, समुपदेशन, नामवंत खेळाडुसोबत संवाद साधणे आदी कार्यक्रम आयोजित करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सोबतच खाशाबा जाधव यांची जीवनगाथा व क्रीडा क्षेत्रातील योगदानावर प्रकाश, शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, पालक, क्रीडा प्रेमी नागरीक यांच्यासोबत करीअर संदर्भात परीसंवाद व चर्चासत्र, आपल्या संघटना, क्लब, केंद्रातील खेळाडूंना चर्चासत्र व परीसंवाद, स्पर्धा, उत्कृष्ट खेळाडूंचा गौरव व पुरस्कार देणे याप्रमाणे विविध उपक्रमांचे आयोजन करुन हा दिवस साजरा करावे व उपक्रमांचा अहवाल जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या dsoytl२४४०६०@gmail.com या ईमेलवर पाठवावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड यांनी केले आहे.

## यवतमाळचा पारा आला ९ अंशांवर

**यवतमाळ** : उत्तरेकडील थंड वारे थेट विदर्भाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. यातून विदर्भात थंडीची लाट पसरली आहे. बुधवारी यवतमाळचा पारा ९ अंशांपर्यंत खाली आला. विदर्भातील सर्वात कमी तापमानाची नोंद यवतमाळात करण्यात आली. बुधवारी गोंदियाचे तापमान ९.४ अंशांवर होते, अमरावती आणि बुलढाणा ९.८ अंशांवर, तर यवतमाळचा पारा किमान ९ अंशांवर स्थिरावला, याठिकाणी २९.४ अंश कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. थंड वाऱ्याचा प्रकोप अधिक असल्याने हुडहुडी भरली आहे.

# कालव्याचे पाणी शेतात सोडत नसल्याने केला प्राणघातक हल्ला

**यवतमाळ, दि.९, महासागर प्रतिनिधी:**कालव्याचे पाणी सोडत असताना ते प्रत्येक शेतात व्यवस्थितपणे पोहोचले पाहिजे याबाबतचे नियोजन केल्या जाते पाणी सोडल्यानंतर ते एकाच वेळी सर्व शेतात जात नाही तर टप्प्याटप्याने जाते असे असतांना सावरगाव येथील शेतकऱ्याने माझ्या शेतात पाणी का सोडत नाही असा आरोप करीत कंत्राटी कर्मचाऱ्यावर थेट कुऱ्हाडीने आणि लोखंडी पाईपने हल्ला चढवून हत्या करण्याचा प्रयत्न केल्याची तक्रार नेर पोलीस स्टेशनला दाखल करण्यात आली आहे. या संदर्भात पोलिसांनी सांगितले की पाटबंधारे विभाग सिंचन प्रकल्पामध्ये प्रकाश नारायण काळे वय वर्ष ४९ राहणार सावरगाव काळे हा कंत्राटी कर्मचारी असून त्याच्याकडे प्रकल्पाने पाणी सोडण्याचे काम देण्यात आले आहे संबंधित कर्मचारी आपले कर्तव्य नियमितपणे बरोबर बजावत असताना सावरगाव काळे येथीलच वासुदेव गोविंद मोरे वय वर्ष ६० आणि त्याच्या दोन सहकाऱ्यांनी आमच्या शेतात पाणी का सोडत नाही असा आरोप करीत त्याला नऊ वाजता च्या दरम्यान गाठले आणि त्याच्याशी भांडण करीत लोखंडी पाईप आणि कुऱ्हाडीने डोक्यावर मारून गंभीर जखमी केले याप्रकरणी प्रकाश काळे यांनी नेर पोलीस स्टेशनला तक्रार दिली असून नेर पोलिसांनी बासुदेव गोविंद मोरे आणि इतर दोन सहकारी यांच्याविरुद्ध वेगवेगळ्या कलमाखाली गुन्हे दाखल केले आहे या दरम्यान घटनास्थळाचा पंचनामा करून महाराणीत वापरलेले लोखंडी पाईप आणि कुऱ्हाड जप्तीची कारवाई पोलिसांकडून केल्या जात आहे तीनही आरोपींना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले असल्याचे सांगण्यात आले आहे तर याउलट वासुदेव गोविंद मोरे वय वर्ष साठ आणि इतर दोघांनी देखील प्रकाश नारायण काळे यांच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे या तक्रारीत प्रकाश काळे हा व्यवस्थितपणे पाणी सोडत नाही कॅनॉलचे पाणी शेतातील पिकांना न मिळताच बंद करतो अशी विचारणा केल्याच्या कारणावरून प्रकाश काळे आणि अभिजीत काळे वय वर्ष २२ या दोघांनी गणेश मोरे यांच्या सोबत वाद करून कुऱ्हाडीच्या दांड्याने डोक्यावर मारून गंभीर जखमी केले तसेच आईला भावाला वडिलांना लाथाबुक्याने मारून जीवाने मारण्याची धमकी दिली अशी तक्रार देखील त्यांनी केली यावरून पोलिसांनी प्रकाश नारायण काळे अभिजीत प्रकाश काळे या दोन्ही व्यक्तीविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत ही घटना सावरगाव येथे दहा वाजताच्या दरम्यान घडलों

# तरुणाचा मृतदेह आढळला

**यवतमाळ, दि.९, महासागर प्रतिनिधी:** पुसद शहरात एका २८ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. ही खळबळजनक घटना गुरुवारी (ता.९) दुपारी १२ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. सदर मृतकाचे नाव गजानन विजय मोरे वय २८ वर्ष रा. तुकाराम बापू वॉर्ड असे आहे. पोलीस सूत्रांच्या प्राप्त माहितीनुसार पुसद शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते सुभाषचंद्र बोस चौक यामधील अमराई समोर आरती ट्रेडर्स या दुकानाच्या बाजुच्या एका गल्लीमध्ये एका २८ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आला. या घटनेनंतर सदरची माहिती ही पोलीस स्टेशन पुसद शहर यांना देण्यात आली. त्यानंतर पोलीस स्टेशन पुसद शहर येथील पोलीस अधिकारी यांनी घटनास्थळी जाऊन मृतदेह ताब्यात घेतले व घटनास्थळचा पंचनामा करण्यात आला. सदर मृतदेह हा शवविच्छेदन करण्याकरिता उपजिल्हा ररुग्णालय पुसद येथे पाठविण्यात आला आहे. सदर घटनेचा अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बी जे व पोलीस निरीक्षक उमेश बेसरकर यांच्या मार्गदर्शनाखली पी. एस. आय. सनगरे हे करीत आहे.



# जिल्हा क्रीडा पुरस्कारांसाठी प्रस्ताव आमंत्रित

**यवतमाळ, दि.९, महासागर प्रतिनिधी:** राज्य शासनाच्या क्रीडा धोरणानुसार सन २०२०-२१ या वर्षाच्या जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविण्यात आले आहे. खेळाडू, मार्गदर्शकांनी आपले प्रस्ताव मुदतीत सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील गुणवंत क्रीडा मार्गदर्शक व गुणवंत महिला, पुरुष, दिव्यांग खेळाडू यांच्यासाठी हा पुरस्कार असून पुरस्काराचे स्वरुप रोख रक्कम १० हजार व प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह असे आहे.

जिल्हा क्रीडा मार्गदर्शक पुरस्कारासाठी सतत दहा १० वर्ष मार्गदर्शक म्हणून कार्य केले असले पाहिजे. वयाची ३० वर्ष पुर्ण केलेली असावे. गुणांकाकरीता जिल्ह्यातील खेळाडूंची कामगिरी ग्राह्य धरल्या जाईल. मागील दहा वर्षात किमान वरिष्ठ गटातील राज्य पदक विजेते तसेच कनिष्ठ राष्ट्रीय, शालेय, ग्रामीण व महिला, खेलो इंडिया मधील राष्ट्रीयस्तरापर्यंतचे पदक विजेते खेळाडू तयार केले असतील, सांघिक अथवा वैयक्तीक मान्यता क्रीडा प्रकरात नॅशनल गेम्स, वरिष्ठ गट राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्रतिनिधित्व केलेला खेळाडू अथवा राज्य, जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम तीन क्रमांकापर्यंत यश मिळविणारे किमान ३ खेळाडू घडविणारा मार्गदर्शक अर्ज करून शकतात. अर्जदाराने मार्गदर्शन केलेल्या खेळाडूचे विहीत नमुन्यातील हमीपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

गुणवंत खेळाडू पुरस्कार महिला, पुरुष, दिव्यांग खेळाडूंना प्रत्येकी दिला जाणार आहे. पुरस्कार वर्षासह लगतपुर्व पाच वर्षापैकी दोन वर्ष त्या जिल्ह्याच्या मान्यताप्राप्त खेळाच्या अधिकृत स्पर्धामध्ये प्रतिनिधित्व केले असावे. खेळाडूंची मान्यताप्राप्त खेळाच्या अधिकृत राज्य, राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेमधील पुरस्कार वर्षाच्यालगतपुर्व पाच वर्षातील राज्य व राष्ट्रीय स्तरावरील वरिष्ठ, कनिष्ठ शालेय, राष्ट्रीय शालेय व केंद्र शासनामार्फत आयोजित क्रीडा स्पर्धामधील राष्ट्रीयस्तरावरील कामगिरी लक्षात घेवून उत्कृष्ट ठरणाऱ्या तीन वर्षातील कामगिरीचा विचार करण्यात येईल. आशियाई गेम्स्, कॉमनवेल्थ गेम्स्, जागतिक चषक क्रीडा स्पर्धा, आशियाई गेम्स, राष्ट्रकुल स्पर्धेत सहभागी होणाऱ्यांना थेट पुरस्कार देण्यात येईल. विहित नमुन्यातील अर्ज संघटनेमार्फत अथवा वैयक्तिकरित्या विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. सदर अर्ज सिलबंद लिफाफ्यात सादर करुन त्यावर पुरस्काराचे नाव व वर्ष, अर्जदाराचे नाव लिहणे आवश्यक आहे.

पुरस्कारा करीता अर्ज करणाऱ्या व्यक्तींनी कामगिरी दि.१ जुलै ते ३० जुन याप्रमाणे वर्ष गृहीत धरण्यात येतील. अर्जासोबत राज्यात गेल्या १५ वर्षापासुन सतत वास्तव असल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडावे. एका जिल्ह्यामध्ये क्रीडा पुरस्कार प्राप्त करणारी व्यक्ती अन्य जिल्ह्यात अर्ज करण्यास पात्र राहणार नाही. पुरस्काराचे विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यवतमाळ येथे दि. १६ जानेवारी पर्यंत प्राप्त करता येईल, असे जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड यांनी कळविले आहे.

# पांढरकवडा प्रेस क्लबची नवीन कार्यकारिणी

**पांढरकवडा, दि.९, महासागर प्रतिनिधी:** मराठी पत्रकार दिनाचे औचित्य साधून केळापूर तालुका प्रेस क्लबची (पांढरकवडा) दरवर्षीप्रमाणे यावर्षीची नवीन कार्यकारीणीची निवड सर्वानुमते करण्यात आली. आशिष बडवे, गणेश अनमुलवार यांच्या उपस्थितीत कार्यकारिणीची निवड करण्यात आली. प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी सुबोध काळपांडे, उपाध्यक्ष निखिल बेले तर सचिवपदी विशाल मग्गीडवार, सहसचिव सुरज चौधरी तर कोषाध्यक्ष सुरज बंडीवार यांची एकमताने निवड करण्यात आली. नितीन बारहाते, अतिक शेख, बाळा सस्ते, गजानन लक्षशेट्टीवार, सागर मुडे हे कार्यकारिणी सदस्य आहेत. नवनियुक्त कार्यकारिणीचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. लोकाभिमुख कार्य करण्यास सदैव तत्पर राहू असे प्रतिपादन अध्यक्ष सुबोध काळपांडे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. नितीन बाराहाते यांनी केले.

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचा दौरा



**यवतमाळ, दि.९, महासागर प्रतिनिधी:** केंद्रीय आयुष मंत्री (स्वतंत्र प्रभार) तथा केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव उद्या शुक्रवार दि.१० जानेवारी रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.दुपारी १२ डॉ.मा.म.आयुर्वेद महाविद्यालय, यवतमाळ येथे आगमण. दुपारी १२.३० वाजता हॉटेल व्हेनेशियन येथे आयोजित सत्कार समारंभ कार्यक्रमास उपस्थित राहतील. दुपारी १.३० वाजता शासकीय विश्राम भवन येथे राखीव. दुपारी २ वाजता मेहकरकडे प्रस्थान करतील.

## आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ. अशोक उईके यांचा दौरा



**यवतमाळ, दि.९, महासागर प्रतिनिधी:** राज्याचे आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ.अशोक उईके जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे. शुक्रवार दिनांक १० जानेवारी रोजी सकाळी १०.१५ वाजता यवतमाळ येथे आगमण व राखीव. दुपारी १ वाजता कळंब तालुक्यातील शासकीय आदिवासी आश्रमशाळा आंतरगाव येथे भेट. सोईनुसार यवतमाळ येथे आगमण व राखीव.


## पाहिजेत

पारवा शिक्षण संस्था, पारवा ता. घाटंजी जि. यवतमाळ द्वारा संचालित
**मातोश्री वत्सलाबाई देशमुख मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, पहापळ**
ता. केळापूर जि. यवतमाळ येथे मा. जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि. प. यवतमाळ यांचे पत्र क्रं.जा.क/यजिप/स.क.वि./वगृ/७३ दिनांक ०७/०१/२०२५ नुसार

**चौकीदार पदा करिता जागा भरणे आहेत.**

| अ. क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शै. अर्हता | मानधन | वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|---|
| १ | वसतिगृह चौकीदार | १ | ०७ वी पास | ७५०० प्रतिमहा | शासन नियमानुसार |

ईच्छूक उमेदवारांनी सर्व मुळ कागदपत्रासह दिनांक २७/०१/२०२५ रोजी सोमवार ला वेळ सकाळी ११.०० वाजता. ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत संस्थेचे कार्यालय आश्रम शाळा, पहापळ ता. केळापूर जि. यवतमाळ येथे स्वखर्चाने उपस्थित रहावे. सोबत शाळा सोडल्याचादाखला, गुणपत्रिका, जातीचा दाखला, नॉनक्रिमीलेअर, आधारकार्ड, झेरॉक्स, स्वसाक्षांकित करूण व दोन फोटो, आणावे.

**टिपः मुलाखती करता आल्यावर लेखी अर्ज द्यावे व अर्जामध्ये आपला पत्ता, संपर्क कंमाक (भ्रमणध्वनी कंमाक) लिहावा.**

स्वा/-
**सचिव**
मातोश्री वत्सलाबाई देशमुख मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, पहापळ ता. केळापूर जि. यवतमाळ



महाराष्ट्र शासन

## विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण विभाग, यवतमाळ

वनभवन प्रशासकिय इमारत, तळ मजला, चर्च रोड, सिव्हील लाईन, यवतमाळ

Phone No. (07232) 242093 Email ID : ytl.ddsfd@gmail.com

**ई-निविदा सुचना क्रं. ०४/२०२४-२५**

सामाजिक वनीकरण विभाग, यवतमाळ अंतर्गत राळेगांव सामाजिक वनीकरण परिक्षेत्रात परिक्षेत्र कार्यालयाचे बांधकाम करणे या कामाबाबतची ई-निविदा सुचना क्र. ०४ मधील ०१ कामाकरीता पात्र नोंदणीकृत कंत्राटदार यांचे गटातून ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदेबाबतचे सविस्तर तपशिल शासनाचे www.mahatender-gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर निविदेचा कालावधी खालील प्रमाणे आहे

| | |
|---|---|
| ई निविदा प्रसिध्दी | दिनांक ३१/१२/२०२४ |
| ई निविदा दस्ताऐवज डाऊनलोड प्रारंभ (Start) | दिनांक ३१/१२/२०२४ |
| ई निविदा दस्ताऐवज डाऊनलोड समाप्त (End) | दिनांक २५/०१/२०२५ ला ५.00 वाजेपर्यंत |
| ऑनलाईन दस्ताऐवज डाऊनलोड उघडणे | दिनांक २६/०१/२०२५ ला ५.00 वाजेपर्यंत |

अटी व शर्ती :- संबंधीत निविदेच्या अटी व शर्ती / शुध्दीपत्रके / सुचना तसेच सविस्तर निविदा सुचना शासनाच्या www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल.

स्वा/-
विभागीय वनअधिकारी
सामाजिक वनीकरण विभाग, यवतमाळ

वि.मा.का./ अम./ जाहि /९८७ /२०२४-२०२५



महाराष्ट्र शासन

## उपवनसंरक्षक, पुसद वनविभाग, पुसद यांचे कार्यालय

सागवानी ईमारती मालाचा जाहिर लिलाव (मैदानी)

दूरध्वनी क्रमांक ०७२३३/२४६०२९

पुसद वनविभागातील सिंगद व नागापुर आगारावर इमारती मालाचा लिलाव आयोजीत केलेला आहे. तरी इच्छुक खरेदीदारांनी या संधीचा लाभ घ्यावा.

सिंगद आगार दिनांक १४/०१/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजेपासुन

| अ. क्र. | तपशिल | विझ्रॉन माल (जुना) अंदाजित | | |
|---|---|---|---|---|
| | | नग | घ.मी. | जलतन (बिट) |
| १ | शासकिय गुन्हा रि.चा माल | 1103 | 35.077 | 2.5 |
| २ | आदिवासी शेत स.नं. | 260 | 20.447 | 0.5 |
| ३ | फेर लिलाव शासकीय | 195 | 5.668 | 00 |
| ४ | फेर लिलाव आदिवासी | 14 | 0.589 | 00 |
| ५ | शासकीय कुपाचा माल | 1975 | 46.333 | 51.5 |
| ६ | जंकास बेलगव्हाण | 1985 | 77.755 | 0.9 |
| ७ | जंकास वसंतपुर (खर्डा) | 187 | 12.503 | 0.5 |
| ८ | जंकास चिखली | 29 | 1.370 | 0.1 |
| | एकुण | 5748 | 199.742 | 69.5 |

नागापुर आगार दिनांक १५/०१/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजेपासुन

| अ. क्र. | तपशिल | विझ्रॉन माल (जुना) अंदाजित | | |
|---|---|---|---|---|
| | | नग | घ.मी. | जलतन (बिट) |
| १ | शासकिय कुपाचा माल | 2694 | 59.841 | 00 |
| २ | आदिवासी शेत स.नं. चा माल | 1170 | 45.367 | 00 |
| | एकुण | 3864 | 105.208 | 00 |

टिप:
१. विक्री किमतीवर नियमानुसार वस्तु सेवाकर-जिएसटी -१८%, आयकर २.५%, भरणा करावा लागेल, केवळ राष्ट्रीयकृत बँकेचा डि.डि. स्विकारण्यात येईल ज्यांचे नांवे माल खरेदी केला असेल त्यांचेच नावाने धनाकर्ष काढावा.
२. अधिक माहिती करीता संबंधीत आगार अधिकारी सिंगद/नागापुर यांचेशी संपर्क साधावा.
३. काहि अपरिहार्य कारणास्तव लिलावाच्या तारखेत बदल करण्याचे तसेच कोणताही माल वगळण्याचे अधिकार राखुन ठेवलेले आहेत.
४. महसुल व वनविभाग शासन निर्णय क्र. एमएफपी-२०१२/प्र.क्र.०१/फ-९ दिनांक १५/०१/२०२० नुसार विक्रीबाबतच्या एकीकृत आगार विक्री शर्ती व अटि लागु राहतील याची सर्व खरेदीदारांनी नोंद घ्यावी.

(डॉ. बी.एन. स्वामी)
उपवनसंरक्षक
पुसद वनविभाग पुसद

विमाका/अम/जाहि/९८९/२०२४-२०२५

## सोलर योजनेच्या अंमलबजावणीला विलंब

**यवतमाळ::** राज्य शासनाच्या 'मागेल त्याला सोलर' या महत्त्वाकांक्षी योजनेत होणाऱ्या विलंबामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. अर्जप्रक्रिया पूर्ण केल्यानंतरही आवश्यक सर्वेक्षण व पुढील प्रक्रिया धीम्या गतीने होत असल्याने शेतकऱ्यांना वेळेत सोलर यंत्रणा मिळत नाही. याच पार्श्वभूमीवर बुधवारी (दि. ८) यवतमाळचे महाऊर्जा प्रकल्पाचे प्रकल्प कार्यकारी अधिकारी दिनेश सुरोशे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी सचिन मनवर, प्रा. पंढरी पाठे, बिरसा ब्रिगेडच्या विद्या परचाके, सामाजिक कार्यकर्त्या लीना बोरकर व शेतकरी प्रकाश कांबळे यांची उपस्थिती होती. शेतकऱ्यांच्या समस्या तातडीने सोडविण्याची मागणी करण्यात आली.

# शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाला मिळाला व्यवसाय गटातील प्रयोगाचा प्रथम क्रमांक

**यवतमाळ, दि.९, महासागर प्रतिनिधी:** जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शनात सादर झालेल्या उत्कृष्ट मॉडेलचे क्रमांक नुकतेच जाहीर करण्यात आले. यात व्यवसाय अभ्यासक्रम विभागातील तांत्रिक गटातून प्रथम क्रमांक श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय यवतमाळ यांनी पटकावला आहे. तर आयटीआय विभागातून इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर गटातून प्रथम क्रमांक मुंगसाजी महाराज आयटीआय दारव्हा यांनी प्राप्त केला.




कौशल्य विकास व उद्योजकता विकास विभागांतर्गत जिल्हा व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण अधिकारी कार्यालय यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय तंत्र माध्यमिक विद्यालयात मंगळवारी जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात उत्कृष्ट ठरलेल्या मॉडेलला राज्य स्तरावर सादरीकरणाची संधी मिळणार आहे.

या तंत्र प्रदर्शनीच्या 'आईडियाथॉन' च्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, अमरावतीचे सहसंचालक प्रदीप घुले, प्रदर्शनाचे उद्घाटन शशांक देशमुख, प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ. विवेक गंधेवार, मा. यु.जी. राजुरकर, जिल्हा व्य. शि. व प्र. अधिकारी, यवतमाळ, प्राचार्य विनोद नागोरे तथा प्राचार्या उषाताई त्रिपाठी उपस्थित होते. या तंत्र प्रदर्शनात यवतमाळ जिल्ह्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे ५६ तर अशासकीय अनुदानित उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाचे ४२ मॉडेल सहभागी झाले होते. सायंकाळी जी.यु. राजूरकर यांच्या अध्यक्षतेखाली तथा प्रा. डॉ. राजेशकुमार संबे, प्राचार्य विनोद नागोरे, प्राचार्य प्रकाश चौथे प्राचार्य राहुल पळवेकर व प्राचार्य उषा त्रिपाठी यांच्या प्रमुख उपस्थितीत यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे संचालन जयेश पळसकर व अतुल आंबेकर यांनी केले.

आयटीआय विभागातून द्वितीय क्रमांक आयटीआय नेर तर तृतीय क्रमांक बाबाजी दाते आयटीआय यवतमाळ यांनी प्राप्त केला. मेकॅनिकल गटातून बाबाजी दाते आयटीआय यवतमाळ यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. द्वितीय क्रमांक आयटीआय राळेगाव, तृतीय क्रमांक आयटीआय उमरखेड व चतुर्थ क्रमांक आयटीआय पुसद यांनी प्राप्त केला. नॉन इंजिनिअरिंग गटातून प्रथम क्रमांक आयटीआय दिग्रस यांनी प्राप्त केला. द्वितीय क्रमांक आयटीआय नेर तर तृतीय क्रमांक आयटीआय अंतरगाव यांनी प्राप्त केला. तसेच व्यवसाय अभ्यासक्रम विभागातील तांत्रिक गटातून प्रथम क्रमांक श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय यवतमाळ यांना प्राप्त झाला. द्वितीय क्रमांक एसपीएम विज्ञान महाविद्यालय घाटंजी तर तृतीय क्रमांक अमोलकचंद कॉलेज यवतमाळ यांनी प्राप्त केला. नॉन इंजिनिअरिंग गटातून प्रथम क्रमांक मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा यांनी प्राप्त केला. द्वितीय क्रमांक अमोलकचंद महाविद्यालय यवतमाळ तर तृतीय क्रमांक उमरखेडच्या गोपिकाबाई गावंडे महाविद्यालयाने प्राप्त केला.

## राज्यस्तरीय कबड्डी सामन्यात 'जीवनदीप'ला विजेतेपद



**यवतमाळ, दि.९, महासागर प्रतिनिधी:** आदिवासी विकास विभागाच्या वतीने नागपूर येथे राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. यात नाशिक, अमरावती, नागपूर व ठाणे विभागातील खेळाडू सहभागी झाले होते. या स्पर्धेत कळंब येथील जीवनदीप आश्रमशाळेच्या कबड्डी संघाने तीनही गटात विजेतेपद पटकाविण्याचा बहुमान मिळविला.

या आश्रमशाळेतील १९ व १७ वर्षे वयोगटातील मुलांच्या, तर १७ वर्षे वयोगटातील मुलींच्या कबड्डी संघाने राज्यस्तरीय स्पर्धेत विजेतेपद पटकाविले. एका शाळेने तीनही प्रकारात थेट राज्यस्तरीय स्पर्धेचे विजेतेपद पटकाविण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे सांगितले जाते. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. विजयी संघातील खेळाडूंचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आदिवासी विकासमंत्री अशोक उईके, नागपूरचे आदिवासी अप्पर आयुक्त ठाकरे, पांढरकवडा येथील प्रकल्प अधिकारी सुहास गाडे यांच्या हस्ते बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला.

या खेळाडूंचे कळंब येथे आगमन होताच ढोल-ताशे वाजवून स्वागत करण्यात आले. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी नृत्य करत आनंद साजरा केला. संस्थेचे अध्यक्ष माजी शिक्षणमंत्री प्रा. वसंत पुरके, उपाध्यक्ष प्रेमलता पुरके, शाळेचे मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक, अधीक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदींनी खेळाडूंचे कौतुक केले.

## संगणक परिचालक संघटनेच्या अध्यक्षपदी धवणे

**यवतमाळ, दि.९, महासागर प्रतिनिधी:** बाभूळगाव तालुक्यातील संगणक परिचालक संघटनेची सभा १ जानेवारी रोजी स्थानिक पंचायत समितीच्या प्रांगणात पार पडली. यात तालुकाध्यक्षपदी सोम धवने, उपाध्यक्ष अतुल कोठारे तर सचिवपदी सचिन कोंबे यांची एक मताने निवड करण्यात आली. यावेळी जाहीर करण्यात आलेल्या तालुका कार्यकारिणीत महिला प्रमुख गायत्री नेहारे, महिला सहसचिव प्रीती बावणे, तांत्रिक सल्लागार नितीन ढाणके, प्रसिद्धी प्रमुख राजेश बनसोड, कोषाध्यक्ष रूपेश कावलकर, प्रमुख सल्लागार आम्रपाली घरडे, सहसल्लागार प्रतिभा विशेकर, संघटक सतीश दातार, महिला उपप्रमुख प्रगती इंगोले, प्रवक्ता शुभम कामडी यांची निवड करण्यात आली.

## वागदरातील बेकायदेशीर व्यवसाय हटविण्याची मागणी

**वणी, दि.९, महासागर प्रतिनिधी:** लगतच्या वागदरा येथील शाम तराळे लेआऊटमधील श्रीरामनगर परिसरात बेकायदेशीरपणे भंगारचे दुकान, वॉटर प्लांट व प्रस्तावित वीटभट्टी तातडीने हटविण्यात यावी, अशी मागणी तेथील नागरिकांनी मुख्याधिकाऱ्यांकडे व तहसीलदारांकडे निवेदनातून केली आहे. या लेआऊटमधील खुल्या प्लॉटवर वस्ती झाली आहे: परंतु तेथे एका इसमाने भंगारचे दुकान उभे केले आहे. या भंगार दुकानासाठी पालिकेकडून कोणतीही परवानगी घेण्यात आली नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. या दुकानापासून तेथील रहिवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे, तसेच भंगारचालकाने आजूबाजूचे प्लॉट काबीज केले असून त्याठिकाणी रात्री-बेरात्री ट्रकद्वारे भंगार उतरविले जात आहे, तसेच याठिकाणी सतत टायर जाळण्यात येत असून नागरिकांच्या आरोग्यालाही धोका निर्माण झाला आहे, तसेच याठिकाणी ओव्हरलोड ट्रकची वाहतूक होत असल्याने लेआऊटमधील रस्त्याची पूर्णतः वाट लागली आहे, तसेच याठिकाणी दोन वेगवेगळे वॉटर प्लांट तयार करण्यात आले असून त्यांनीही पालिकेची परवानगी घेतली नसल्याचा आरोप केला आहे.



दोन्ही ठिकाणाहून पाण्याचा वारेमाप उपसा होत असून भविष्यात याठिकाणी पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची भीती व्यक्त केली आहे, तसेच याठिकाणी वीटभट्टी सुरू करण्याच्या हालचाली सुरू आहेत. यामुळे नागरिकांना पुन्हा त्रास सहन करावा लागणार आहे. त्यामुळे प्रशासनाने याकडे लक्ष देऊन हे बेकायदेशीर व्यवसाय हटवावे, अशी मागणी गंगाराम चंदलवार, राणी मोरे, शांताबाई अल्लीवार, मंगेश राऊत, दुर्गा सिंगारपोवार, गीता दोरखंडे, अर्पिता उमरे, रेशिता अलीवार, विलास चंदलवार, सुनील पांढरे, चंपत सूर्यवंशी यांच्यासह अनेक नागरिकांनी केली.

## बेंबळा प्रकल्पग्रस्तांचा सामूहिक आत्महत्येचा इशारा

**यवतमाळ, दि.९, महासागर प्रतिनिधी:** बेंबळा प्रकल्पाकरिता संपादित जमिनीपैकी दाभा व पहूर या दोन गावातील काही जमीन बेंबळा प्रकल्पाने वनविभागाला देण्याची कार्यवाही सुरू केली. शिवाय दोन दिवसात जमिनी खाली करा, अशा सूचना देखील शेतकऱ्यांना दिल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेऊन मंगळवारी बेंबळा प्रकल्प कार्यालयावर धडक दिली. तसेच वन विभागाला जमिनी हस्तांतरित केल्या तर शेतकरी सामूहिक आत्महत्या करतील, असा इशारा यावेळी देण्यात आला आहे. बेंबळा प्रकल्पासाठी जलसंपदा विभागाने दाभा आणि पहुर या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी प्रकल्पाचे पाणी संचय करण्यासाठी घेतल्या होत्या. यानंतर बेंबळा प्रकल्पातील नियोजित पाणीपातळी बदलून कमी करण्यात आली. यामुळे दोन्ही गावातील काही शेतजमिनीवर पाणी संचय होत नसल्यामुळे शिल्लक पडल्या आहेत. त्यामुळेच वनसंरक्षकांच्या पत्रानुसार दाभा व पहूर या गावांची ३१५.७५ हेक्टर जमीन चंद्रपूर जिल्ह्यातील असोलमेंढा प्रकल्पाच्या नूतनीकरणाच्या कामासाठी देण्याची प्रक्रिया सुरू आहे. संबंधित दोन गावांतील शेतकऱ्यांना कोणतीही माहिती न देता ही जमीन वनविभागाच्या ताब्यात देण्याची कारवाई देखील सुरू केली आहे. मात्र सदर जमिनीच्या मोबदल्याचे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. काही शेतकऱ्यांना अद्यापही नुकसान भरपाई मिळालेली नाही. सदर जमीन घ्यायची असल्यास समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर शेतजमिनीचा मोबदला देऊन दोन्ही गावांचे पुनर्वसन करण्यात यावे, अन्यथा जमीन वनविभागाला न देता आम्हला शासकीय कर, फी, मोबदला घेऊन वहितीस देण्यात यावी. अन्यथा जलसामधी घेवून सामुहिक आत्महत्या करू, असा इशारा शेतकऱ्यांना बेंबळा प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता स.शि. मुन्नोळी यांना निवेदनातून दिला.



## दाभा येथे शाकंभरी देवी नवरात्रोत्सव

**यवतमाळ:** दाभा (पहूर) येथील दुर्गामाता मंदिरात शाकंभरी देवी नवरात्रोत्सवाला प्रारंभ झाला आहे. देवी भागवत पुराणाचे प्रवक्ते हभप तुळशीराम महाराज आहे. कलश स्थापना गुरुदेव सेवा मंडळाचे भजन वसंतराव इंगोले यांचा पंचरंगी कार्यक्रम मागील दोन दिवसांत पार पडला, ९ जानेवारी रोजी रात्री हभप गणेश चांदेकर महाराज (कारेगाव यावली) यांचे राष्ट्रीय कीर्तन होणार आहे. १० रोजी हभप सोपान महाराज चचाने (ब्राह्मणवाडा पश्चिम) यांचे हरिकीर्तन होईल. ११ रोजी माँ भवानी गोंधळी संच (वायगाव हळद्या) यांचा गोंधळाचा, तर १२ रोजी अंध कल्याण संघ (अमरावती) यांचा संगीताचा कार्यक्रम होणार आहे. १३ रोजी सकाळी १० वाजता हभप तुळशीराम महाराज यांचे काल्याचे कीर्तन होईल.

## खेड ते माहूरगड पालखी पदयात्रा

**आर्णी:** तालुक्यातील खेड येथील श्री गणपती संस्थाच्या वतीने खेड ते माहूरगड, दत्त शिखरपर्यंत पालखी पदयात्रा काढण्यात आली. ही पालखी पदयात्रा मुंबई येथील कामगार आयुक्त राजेश आडे व नीता आडे यांच्या नेतृत्वात निघाली असून यात भजनी मंडळ सहभागी आहे. पालखी पदयात्रा लोणी, जवळा या मागनि येत असताना ६ जानेवारीला सायंकाळी आर्णीत दाखल झाली. यावेळी संतोष श्रीवास, अरूणा श्रीवास व राजेश श्रीवास, धनवन्तरी श्रीवास यांनी पालखीची पूजा, आरती केली. त्यानंतर राजेश आडे व नीता आडे यांचा संतोष श्रीवास व राजेश श्रीवास यांनी सत्कार केला. तसेच पालखी पदयात्रे सहभागी असणाऱ्या सर्व भाविकभक्तांची नास्ता, चहापाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

# १२ जानेवारी रोजी मंगळ ग्रह पृथ्वीपासून किमान अंतरावर

■ 16 जानेवारीला मंगळ ग्रहाची पोर्णीमा

**यवतमाळ, दि.९, महासागर प्रतिनिधी:** रविवार दि. १२ जानेवारी रोजी सूर्यमालेतील लाल ग्रह मंगळ, पृथ्वीच्या जवळ येणार आहे. त्यामुळे यादिवशी हा ग्रह जास्तीत जास्त प्रकाशीत राहील. त्यामुळे यादिवशी खगोल अभ्यासक व सामान्य जनतेला याचे निरिक्षण करण्याची उत्तम संधी आहे. मात्र यावेळी दि.१३ ला पोर्णीमा असल्याने चंद्रसानिध्यामुळे काही दिवस मंगळ ग्रहाची तजस्विता कमी भासेल. मंगळ ग्रह पृथ्वीच्या कक्षेच्या बाहेर असल्यामुळे त्याच्या परीभ्रमणाची कक्षा जास्त विस्तारीत आहे. त्यामुळे त्याला सूर्याभोवती एक फेरी पूर्ण करण्यास ६८६.८९ दिवस म्हणजेच सुमारे २३ महीने



लागतात. म्हणजेच मंगळाचे वर्ष हे पृथ्वीपेक्षा १.८८ पटीने मोठे आहे. सरासरी सूर्याभोवती पृथ्वीच्या दोन फेऱ्या होतात, तेव्हा मंगळाची एक फेरी पूर्ण होते. परंतू दोन्ही ग्रह गतीमान असल्यामुळे दर २६ महीन्यांनी मंगळ पृथ्वीच्या जवळ येतो. यावेळी पृथ्वी ते मंगळ हे अंतर ९ कोटी ६० लाख ८४ हजार ९९ कि.मी. राहील.

ज्या पध्दतीने चद्र, पृथ्वी व सूर्य एका रेषेत आल्यामुळे सूर्याचा प्रकाश चंद्राच्या आपल्याकडील पूर्ण भागावर पडतो व आपल्याला चंद्राची पोर्णीमा अनूभवावयास मिळते, त्याचप्रमाणे सूर्य, पृथ्वी व मंगळ एका सरळ रेषेत आल्यामुळे सुर्याचा प्रकाश मंगळाच्या पृथ्वीकडील बाजूवर पडून ती बाजू पूर्ण प्रकाशीत होते. व चंद्राप्रमाणेच मंगळाची पोर्णीमा होते. सूर्य पृथ्वी व एखादा ग्रह सरळ रेषेत आल्यास त्याला युती असे सुध्दा म्हणतात. हीच स्थिती दिनांक १६ जानेवारी रोजो येणार असून या दिवशी मंगळाची पोर्णीमा अनुभवता येणार आहे. या दिवशी चंद्र, शुक, व गुरु ग्रह वगळता आकाशात सर्वात जास्त तेजस्वी पिंड हा मंगळ असेल. त्यामुळे खगोल अभ्यासकांना यादिवशी मंगळाचे निरिक्षण करण्याची उत्तम संधी आहे. प्रभावी दुर्बीणीने त्याचा पृष्ठभाग व धृव प्रदेशावरील बर्फाची टोपी सहज पाहता येते. साधारण दुर्बीणीनेही त्याचा गोल आकार व त्यावरील दऱ्यांचा काळसर पटटा पाहता येतो. इतर वेळेस मंगळ ग्रह दुर्बीणीने ताऱ्यासारखा चमकदार दिसतो. बरेचदा अशावेळी आकाशात चंद्र जर नसेल तर ग्रामीण भागातून मंगळाचे चांदणेही अनुभवता येते, सध्या मंगळ ग्रह 'कर्क" राशीत असून तो रात्री ७.०० वाजता पूर्वेस उगवतो व रात्रभर आकाशात राहतो. त्यामुळे सामान्य जनतेलाही याचे अवलोकन करण्याची उत्तम संधी आहे.

मंगळ हा ग्रह भविष्यात वस्ती करण्यास उपयुक्त होउ शकतो. त्यामुळे मंगळाचा अभ्यास करण्यासाठी रशिया, अमेरीका, जपान, भारत इत्यादी देशांनी मोहीमा राबविल्या आहेत. अवकाशातील पिंडांबाबत जनसामान्यात बरेच गैरसमज बाळगले जातात. वास्तविक कोणत्याच ग्रहांचा कोणाच्याच जीवनात तथा व्यवहारात हस्तक्षेप नसतो. कोणावरच ग्रहांचे बरे वाईट परिणाम होत नाहीत. सध्या मंगळ ग्रह जवळ असल्यामुळे राशीपरत्वे कोणावरही शुभाशुभ परिणाम होणार नाही. त्यामुळे प्रत्येकाने मंगळाविषयीचे अमंगळ गैरसमज झुगारून देउन या ग्रहाचे निरिक्षण करावे असे आवाहन स्काय वॉच ग्रुप, यवतमाळचे अध्यक्ष, रविंद्र खराबे, राम जयस्वाल, प्रमोद जिरापूरे, प्रशांत भगत, देवेंद्र पांडे, उमेश शेंबाडे, भूषण ब्राम्हणे, जयंत कर्णीक, पूजा रेकलवार, व मानसी फेंडर यांनी केले आहे.

## » संक्षिप्त...

### नेर येथे नाफेडचे खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी



**नेर :** शेतकऱ्यांना सोयाबीन विकणे सोयीचे व्हावे, चांगला भाव मिळावा, यासाठी नेर येथे नाफेडचे खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे. यासाठी तालुकाध्यक्ष सुनील खाडे यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना निवेदन देण्यात आले. येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमधील सोयाबीनची ऑनलाइन नोंदणी बंद झाली आहे. याकरिता १५ जानेवारीपर्यंत मुदत वाढवून नोंदणीसाठीचे संकेतस्थळ पूर्ववत करण्याची आवश्यकता आहे. तालुक्यात आधीच नापिकी आहे. यातच शेतकऱ्यांना अतिशय कमी दरात सोयाबीन विकावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. व्यापारी वर्ग कमी दरात सोयाबीन घेत आहे. नाफेडने खरेदी सुरू केल्यास शेतकऱ्यांना क्विंटलमागे एक हजार रुपयांपर्यंत फायदा मिळू शकतो. यावर तातडीने निर्णय होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. निवेदन देताना नारायणराव वाघ, दिलीप जयस्वाल, गोकुल खासदार, प्रवीण गेडाम आदींची उपस्थिती होती.

### पार्डी गावात मोदी आवास योजनेच्या घरकुलाची पाहणी



**पुसद :**पुसद पंचायत समिती अंतर्गत असलेल्या पार्डी गावाला पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय राठोड यांनी भेट देऊन विविध विकास कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी मोदी आवास योजनेच्या घरकुलाची पाहणी केली, तसेच जिल्हा परिषद शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. पार्डी ग्रामपंचायतीमध्ये झालेली कामे भूमिगत नाली, सिमेंट रोड पेवर ब्लॉक, स्मशानभूमीचे वॉल कंपाउंड, तसेच घरकुले पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी विजय इसलकर, सरपंच उषाबाई जाधव, गृहनिर्माण अभियंता आकाश राठोड, समाधान केवटे, नंदू कांबळे, विठ्ठल जाधव, रामदास केवटे, समाधान शिनगारे आदी उपस्थित होते.

### शेगाव संतनगरीत पत्रकारांचा सन्मान



**दिग्रस:** येथील श्री साई क्रीडा व शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गजानन निचत यांच्या पुढाकारातून श्रीक्षेत्र शेगाव येथे संत गजानन महाराज मंदिर परिसरातील कृष्णाजींच्या मळ्यात सोमवारी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त प्रेस क्लबच्या १२ पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. प्रमुख अतिथी प्रेस क्लबचे संस्थापक अध्यक्ष बबनराव इंगळे होते. कार्यक्रमाचे संचालन सुरेंद्र मिश्रा यांनी, तर प्रास्ताविक अभय इंगळे यांनी केले. आभार पत्रकार रामदास पद्मावार यांनी मानले. यावेळी बबनराव इंगळे, प्रकाश सातघरे, नवल ठोंबे, रामदास पद्मावार, सुरेंद्र मिश्रा, संजय शुक्ला, अभय इंगळे, हनुमान रमावत, संदीप चिस्तळकर, प्रमोद रोडे, संदीप रत्नपारखी यांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

### अशोक गायकवाड, कैलास घुगरे व विजय कदम सन्मानित



**ढाणकी,दि.९,महासागर प्रतिनिधी:**येथील अशोक गायकवाड, कैलास घुगरे व विजय कदम यांना पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये योगदानासाठी युवा ग्रामीण पत्रकार संघाकडून ' पुरस्कार ' देऊन सन्मानित करण्यात आले.

### सूर्यवंशी बहुउद्देशीय संस्थेतर्फे वृक्षारोपण



**उमरखेड :** येथील संत गजानन वॉर्डमधील ओपन स्पेसचा समाजाकरिता विविध उपक्रमासाठी उपयोग व्हावा, या उद्देशाने स्व. श्रीराम सूर्यवंशी बहुउद्देशीय संस्थेनेच्या वतीने वृक्षारोपण केले. संस्थेमार्फत पर्यावरण शिक्षण काळाची गरज, वैश्विक तापमान वाढ, हरितगृह परिणाम, पक्ष्यांचे महत्त्व निसर्गावर आधारित पोस्टर स्पर्धा, मॉडेल मेकिंग स्पर्धा असे विविध उपक्रम राबविले जात आहे. याविषयी मार्गदर्शन मान्यवरांनी केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष किसन सूर्यवंशी संस्थेचे सदस्य नानाराव खापरे, दिलीप शिंदे, पर्यावरण मित्र दिनेश जाधव, संकेत खापरे, अथर्व खापरे यांची उपस्थिती होती.


: आरएनआय रजिष्ट्रेशन क्रमांक :
-२०१०/३५७९९-

महासागर यवतमाळ

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्णा तन्मुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, बस स्टँड चौक, होटल प्रकाश जवळ, यवतमाळ येथे प्रकाशित केले. संपादक-श्रीकृष्ण तनमुखदास चांडक मुख्य कार्यालय पोन-०७१२-२७६७६२८-९९२२९७००२३ स्थानिक संपादक-रघुवीरसिंह चौहान फोन-९४२३४३३२४४ (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहिल.)

